# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार, दिनांक २९ जुलै २०२४
# ठळक बातम्या

1. **सरकारच्या विविध धोरणात्मक पावलांमुळे देशातला बेरोजगारीचा दर ३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आल्याचं कामगार आणि रोजगार मंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांचं लोकसभेत प्रतिपादन.**
2. **विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची लोकसभेत जातीनिहाय जनगणना आणि शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी देण्याची मागणी.**
3. **जगभरात आज व्याघ्र दिन साजरा, ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पातील इको-टुरिझमचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधून केलं कौतुक.**
4. **हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्ला यांचा एकशे दोनव्वा वार्षिक उर्स आज पासून विविध धार्मिक कार्यक्रमांनी केला जाणार साजरा.**

****

**संसद बेरोजगारीचा दर**

देशात नोकऱ्यांची कमतरता नसून सरकारच्या विविध धोरणात्मक पावलांमुळे देशातला बेरोजगारीचा दर तीन पूर्णांक दोन दशांश टक्क्यांपर्यंत खाली आल्याचं प्रतिपादन कामगार आणि रोजगार मंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत केलं. प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना ते उत्तर देत होते. येत्या काही वर्षांत बेरोजगारीचा दर तीन टक्क्यांच्या खाली येईल अशी आशा, त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधानच्या पॅकेजमुळ येत्या पाच वर्षांत चार कोटीपेक्षा जास्त युवकांना रोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी मिळतील असं, सांगून त्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पाचं कौतुक केलं. हे ध्येयपूर्ण करण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**राहुल गांधी**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आज केंद्रीय अर्थ संकल्पावरची चर्चा पुढे सुरू असून, अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी तेवीस जुलै रोजी अर्थसंकल्प सादर केला होता. त्यावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणना आणि शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी देण्याची मागणी आज संसदेत केली. अर्थसंकल्पात किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी शेतकऱ्यांना लाभ प्रदान करेल असं आज लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान ते म्हणाले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यमान सरकारच्या धोरणांवर टीका करत अग्निवीर योजनेवरही प्रश्न उपस्थित केले. केंद्रीय अर्थसंकल्पात, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी काहीही दिलेलं नाही असंही राहुल गांधी म्हणाले.

**लोकसभा**

दिल्ली इथल्या प्रशिक्षण केंद्रात तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याच्या प्रकरणावर आज लोकसभेत चर्चा झाली. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी भाजपा आणि काँग्रेसनं केली. दिल्ली सरकारच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळ ही दुर्घटना झाल्याचा आरोप भाजपा खासदार बांसुरी स्वराज यांनी आज शून्य प्रहरात केला. याच्या चौकशीसाठी गृह मंत्रालयानं एक समिती स्थापन करावी, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेसचे खासदार शशी थरूर, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, अपक्ष खासदार राजेश रंजन यांनीही या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली. दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद राज्यसभेतही उमटले. प्रशिक्षण केंद्रं हा व्यवसाय झाला असून, याकडे लक्ष वेधण्यासाठी संक्षिप्त चर्चा घेण्यात यावी असं त्यांनी सुचवलं. याबाबत आपल्या दालनात सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेणार असल्याचं सभापती धनखड यांनी सांगितलं.

**पक्ष फुटी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं अजित पवार गटाला नोटीस जारी केली असून, पक्ष सोडून गेलेल्या आमदारांना अपात्र करण्यासंदर्भात शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवर, आज झालेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं ही नोटीस जारी केली आहे.

**बावनकुळे**

राजकारणात चाळीस वर्ष घालवलेल्या शरद पवारांसारख्या राष्ट्रीय नेत्यांनी महाराष्ट्रात जातीय दंगली घडतील अशी भविष्यवाणी करणे हे चांगल्या राजनीतीचं लक्षण नाही असं भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. महाराष्ट्रातील जाती समुदायांना घेवून शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हि प्रतिक्रिया दिली. विरोधक, विशेषत्वानं काँग्रेस जाती-जातींमध्ये तेढ वाढेल अशा तऱ्हेनं संभ्रम जनतेत पसरवत आहे. परंतु महाराष्ट्राची जनता अशा राजकारणाला बळी न पडता त्यांना मतदानाच्या माध्यमातून धडा शिकवेल असं देखील बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

**मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४**

राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ शासनानं लागू केली आहे. त्यामुळ आता साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंपाचा वापर करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. या योजनेचा तीन वर्षांत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल असं, या संदर्भातल्या शासन निर्णयात म्हटलं आहे. या योजनेमुळे, सध्या देण्यात येणारे वीज दर सवलतीचे सहा हजार ९८५ कोटी रुपये तसंच वीज दर माफीनुसार सात हजार ७७५ कोटी रुपये खर्च होणार आहे. त्यामुळे एकूण १४ हजार ७६० कोटी रुपयांची वीज दर माफी राज्यातील शेतकऱ्यांसाठी केली जात आहे.

**व्याघ्र संवर्धन**

जगभरात आज व्याघ्र दिन साजरा केला जात असून, वाघांच्या नैसर्गिक अधिवासांच्या संवर्धनासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करणं तसंच त्याबद्दल जनजागृती करणं आणि वाघांच्या संवर्धनात येणाऱ्या समस्यांवर विचार करणं या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. जगातल्या एकूण वाघांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक वाघ भारतात आढळतात. याच पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाचे मंत्री भूपेंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली, राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाची २५वी बैठक पार पडली.

*****

काल प्रसारित झालेल्या मन कि बातमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा आवर्जून उल्लेख केला. जगातील ७० टक्के वाघ भारतात असल्याचं सांगून, स्थानिक गोंड आणि माना जमातीच्या बांधवांचा विशेष उल्लेख करीत, त्यांनी इको टुरिझम सोबत जुळवून घेतलं असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून-

दरम्यान, ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील देखण्या आणि रुबाबदार वाघाच्या दर्शनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत, लक्षणीय वाढ झाली असून, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल तीन लक्ष ७८ हजार ४३४ पर्यटकांनी ताडोबा व्याघ्र दर्शनासाठी हजेरी लावली.

*****

वाघ हा नैसर्गिक परिसंस्थेच्या सर्वोच्च स्थानावर असून, वाघाचे संवर्धन म्हणजे नैसर्गिक परिसंस्थेचं संवर्धन असल्याचं प्रतिपादन, वनसंरक्षक आय.एफ.एस. अधिकारी भरतसिंह हाडा यांनी केलं. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त आज रोटरी क्लब ऑफ नागपूर एलाईट आणि एशियाटिक बिग कॅट सोसायटीतर्फे, घोषवाक्य आणि बॅनर स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितांना संबोधित करत होते. शहरातील सिविल लाईन्स इथल्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स नजीक असलेल्या वाघांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. केवळ वाघांचे संरक्षण नव्हे तर एकूणच वन्य प्राण्यांच्या संरक्षणाची गरज, भरतसिंह हाडा यांनी बोलून दाखविली. नागपुरात सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु असताना देखील विविध शाळांचे विद्यार्थी पोस्टर, बॅनर घेऊन 'वाघ बचाओ-पर्यावरण बचाओ'च्या घोषणा देताना दिसून आले.

**बाबा ताजुद्दीनका १०२वां सालाना उर्स**

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्ला यांचा १०२वा वार्षिक उर्स आज पासून दहा ऑगस्ट पर्यंत उत्साहात साजरा केला जाणार आहे. वार्षिक उर्सनिमित्त, हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टतर्फे विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार असून, वार्षिक उर्समध्ये देश-विदेशातील लाखो भाविक नागपूरच्या ताजाबाग इथं पोहोचणार आहेत. हे पाहता ट्रस्टतर्फे सुमारे पंधरा लाख लोकांसाठी लंगर भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. आज सकाळी अमीर शरियत मुफ्ती

अब्दुल कादिर यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम धर्मगुरू मौलाना मोहम्मद हाश्मी मियाँ यांच्या उपस्थितीत, पारंपारिक पद्धतीनं ध्वजारोहण करण्यात आलं. ३१ जुलै रोजी ईशाच्या नमाजानंतर दर्गा प्रांगणात कव्वालीचं आयोजन करण्यात येणार आहे. दोन ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता ताजाबाद इथल्या हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून शाही मिरवणूक निघेल.

**कीड व्यवस्थापन**

केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या वनस्पती संरक्षण संग्रहण संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या नागपूरच्या नवीन सचिवालय सिविल लाईन स्थित केंद्रीय एकीकृत कीड व्यवस्थापन केंद्र क्षेत्रीय कार्यालयाद्वारे महाराष्ट्रातील तसंच मध्यप्रदेशातील चाळीस कृषी अधिकाऱ्यांसाठी एकीकृत कीड व्यवस्थापनावर, मानव संसाधन विकास कार्यक्रमांतर्गत, पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन आज करण्यात आलं. आजपासून दोन ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या पाच दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कृषी अधिकाऱ्यांना जैविक नियंत्रणाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचावं याचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

**उरण अत्याचार प्रकरण-ॲड मेश्राम**

नवी मुंबईतील उरण शहरात एका मुलीची निघृण हत्या करण्यात आली. संपूर्ण देशाला हादरवणारी ही घटना असून, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी उरण प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा आणि आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी, भाजपचे प्रदेश-उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी, राज्याचे गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

**मध्य रेल्वे**

रेल्वे सुरक्षा आणि ऑपरेशनल कार्यक्षमता सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नागपूर विभागाच्या ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन विभागानं सतरा प्रमुख स्थानकांवर फूट ओव्हर ब्रिजवर ऑनलाइन सोलर कॅमेरे यशस्वीरित्या स्थापित केले आहेत. या स्थानकांमध्ये, घोडाडोंगरी, बैतूल, आमला, परासिया, मुलताई, पांढुर्णा, काटोल, नागपूर, अजनी, खापरी, बुटीबोरी, सेवाग्राम, वर्धा, धामणगाव, वरोरा, चंद्रपूर आणि बल्लारशाह यांचा समावेश आहे. हे कॅमेरे येणाऱ्या आणि जाणाऱ्या

गाड्यांवरील पॅन्टोग्राफच्या स्थितीचे निरीक्षण करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. रिअल टाइम मॉनिटरिंग प्रदान करून, ही प्रणाली चालत्या गाड्यांच्या पॅन्टोग्राफमध्ये कोणताही बिघाड लवकर ओळखण्यास सक्षम करत. या ऑनलाइन सोलर कॅमेऱ्यांच्या अंमलबजावणीमुळे संभाव्य समस्यांना जलद आणि अधिक अचूक प्रतिसाद मिळून, रेल्वे वाहतूक व्यत्यय लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये आज नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत महिला गटात रमिता जिंदल हिला पदक मिळवण्यात अपयश आलं. अंतिम क्रमवारीत ती सातव्या स्थानापर्यंतच पोहोचू शकली. तर या स्पर्धेच्या पुरुष गटात भारताकडून अर्जुन बबुताने अंतिम सामन्यात ४ थ स्थान मिळवलं. भारत आणि अर्जेंटिना दरम्यान नुकताच झालेला ग्रुप बी मधील हॉकी सामना १-१ ने बरोबरीत सुटला आहे. तर सात्विक-चिराग या जोडीला बॅडमिंटन पुरुष दुहेरी गटाच्या गटातील सामन्यात जर्मनीच्या मार्क लॅम्सफस आणि मार्विन सीडेलविरुद्ध वॉकओव्हर देण्यात आला आहे.या स्टार जोडीचा पुढील सामना 30 जुलै रोजी होईल.

**हवामान**

येत्या काही तासात विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ अमरावती, अकोला भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही ठिकाणी, मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर बुलढाणा, गोंदिया आणि वाशीम जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**वाशिम द्वितीय**

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या जिल्हा शल्य चिकित्सक रँकिंगमध्ये, राज्यात वाशिमचा द्वितीय क्रमांक आला असून, जिल्ह्याला पहिल्यांदाच हा मान मिळाला आहे. महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा संचालनालयाकडुन, विविध राष्ट्रीय आरोग्य कायक्रमाचे रँकिंग करण्यात येते.

*****